## अर्थशास्त्र विभाग~

**प्रस्तावना:**

अर्थशास्त्राची परिभाषाच नव्हे तर संपूर्ण अर्थशास्त्र विषयच उपयोजित असा आहे. रटाळ, बुरसटलेल्या आणि अध्यात्मिक विचाराचा वाटणारा सर थॉमस माल्थस यांचा लोकसंख्येचा सिद्धांत कोविड-19 मुळे आपली सत्यता पडताळून परत खरा ठरला आहे. अर्थशास्त्र विषय समजून घेताना, शिकताना आणि शिकवतांना त्यांच्यातील मानवी वर्तन, राजकीय निर्णय आणि पर्यावरणीय परिस्थितीमुळे तो अधिक प्रवाही, बदलता आणि संशोधित होत असल्यामुळे शिकवण्यातील आणि शिकण्यातील संधी आणि आव्हानात सतत वाढ होत असते. सन 2020 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक (मेमरी ऑफ अल्फ्रेड नोबेल, इकॉनॉमिक सायन्स सेवेरिजस स्विस बँक पुरस्कार) अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातील

पॉलआर.मिलग्रोम आणि रॉबर्ट बी. विल्सन यांना रॉयल स्वीडिश अकॅडमीने प्रदान केलेत. त्यांच्या संशोधनाचा विषय "लिलाव सिद्धांतातील सुधारणांसाठी आणि नवीन लिलाव स्वरूपाच्या शोध" असा आहे विक्रेते, ग्राहक, करदाते यांना त्यांच्या सैद्धांतिक शोधाचा प्रगत देशात लाभ होत असताना, भारतात मात्र कृषी कायद्यात आमूलाग्र बदल करून शेतकऱ्यांच्या मालाला हमी भावापेक्षा कमी किमतीत, लिलावाला बंदी असणारे, शेतमालाला हमखास खरेदीदार आणि समाधान कारक भाव देणारी यंत्रणाच (कृषी उत्पन्न बाजार समित्या) नष्ट करणारे कायदे लागू करण्यात आले आहे. शेतकरी आंदोलने, ई-कॉमर्स, कोविड-१९, सरकारची बदलते धोरण, विद्यापीठाचा बदलता अभ्यासक्रम, नवीन परीक्षा पद्धती इत्यादी आव्हानाला तोंड देण्याचा अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अध्ययन आणि अध्यापनाचे कार्य सन 2020-21 वर्षात करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर:**

Zoom App, LMS, Google meet, Test Mooz, Google form, you tube channel, Whats App, Text Message.

कार्यवृत्तांत:

### १) जागतिक लोकसंख्या दिन:( ११ जुलै २०२०)

शिक्षण प्रसारक मंडळाच्या तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० जुलै 2020 रोजी जागतिक लोकसंख्या दिन झूम मीटिंग द्वारे घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शि. प्र. मं. प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांनी केले. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. अनिल गारोडे हे होते. प्रमुख वक्ते प्रो. डॉ. दिलीप महाजन यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आणि प्रस्तावित प्राध्यापक डॉ. सुनिता कलाखे यांनी केले, तर आभार प्रा.विजय वाकोडे यांनी मानले.

### 2. राष्ट्रीय वेबिनार (31 जुलै 2020):

अर्थशास्त्र आणि वाणिज्य विभागाच्यावतीने भारतीय अर्थव्यवस्था आणि covid-19 (covid-19 effect on Indian Economy ) या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या व्यवस्थापनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. रमेश सरदार हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तर प्राचार्य डॉ अनिल गारोडे यांच्या अध्यक्षतेखाली हा राष्ट्रीय वेबिनार संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरवठा राजू गवई संचलन प्रा.डाँ. सुनिता कलाखे आभार प्रा. सुरेश गवई यांनी केले. देशभरातून या वेबिनार ला 320 अभ्यास उपस्थित होते.

**3.राज्यस्तरीय परिसंवाद (13 फेब्रुवारी 2021):**

"केंद्रीय अर्थसंकल्प 2021 चे अंतरंग" या विषयावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाचे, प्रा.डा. धीरज कदम यांचे व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ अनिल गारोळे तर चर्चासत्रांमध्ये प्रो. वनिता पोच्छी, प्रो. दिलीप महाजन इत्यादींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ.सुनीता कलाखे तर आभार प्रा. अंकित काळे यांनी मानलेत या कार्यक्रमाला 112 विद्यार्थी सहभागी झाले होते.

**4.अर्थशास्त्र प्रश्नमंजुषा**

वर्षभरात खालील तीन प्रकारच्या प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्यात.

***4.1 जिल्हा प्रश्नमंजुषा ( दि 1 मे 2020):**

covid-19 आणि आर्थिक स्थिती या विषयावर जिल्हास्तरावर अर्थशास्त्र विषयाची सामान्यज्ञान परीक्षा TextMooz या वेबसाईटचा वापर करून घेण्यात आली. या परीक्षेमध्ये 20 प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये 120 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**4.2 राष्ट्रीय प्रश्नमंजुषा (दि 3 एप्रिल 2021) :**

राष्ट्रीय स्तरावरील अर्थशास्त्र विषयाच्या सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा गुगल फॉर्म या तंत्रज्ञानाचा वापर करून घेण्यात आली. या स्पर्धेत बारा विद्यापीठातील 291 विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

**4.3 संशोधन पद्धती प्रश्नमंजुषा**

संशोधन पद्धती या विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली यामध्ये संशोधन पद्धतीची प्राथमिक माहिती, तंत्र, पद्धती यावर प्रश्न विचारण्यात आले होते.

**5. * पीएचडी कोर्स:***

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा सलग्न अर्थशास्त्र संशोधन केंद्रातर्फे अर्थशास्त्र आणि संशोधन पद्धतीचा अभ्यासक्रम झूम, ऑडिओ कॉन्फरन्स, प्रत्यक्ष, फोनद्वारे अध्यापन करण्यात आले आहे. याद्वारे दोन विद्यार्थी सहभाग घेऊन उत्कृष्ट गुण मिळवून पीएचडी कोर्सवर परीक्षा

उत्तीर्ण झाले. या संशोधन केंद्रासाठी केंद्र संयोजक म्हणून प्रा. डॉ. इमतिहाज जूकलकर व प्राचार्य डॉ. अनिल गारोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

उत्तीर्ण संशोधन विद्यार्थ्यांची नावे:

1. श्री राजू बाळासाहेब बडे
2. ज्ञानोबा दत्ता चव्हाण


6 . राज्य राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थ्यांची कामगिरी:

7 . प्रकाशित संशोधन पेपर:

**College Result**

**Annual**

| Session | Class | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | | 2020-21 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | W | S | W | S |
| College Result | B.A.III | 83.33% | 88.23% | 82.92% | 96.55% | 73.33% | 100% | 100% | | |





*Shri Shivaji Science & Arts College, Chikhli Dist. Buldana*

*Department of Economics*

*Comparative Result Analysis*

| Session | Class | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | | 2020-21 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| University Result | | 87.22% | | | | | W | S | W | S |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | W | S | W | S |
| College Result | B.A.III | 83.33% | 88.23% | 82.92% | 96.55% | 73.33% | 100% | 100% | | |
| **Comparative Result** | | | | | | | W | S | W | S |
| | | | | | | | | | | |